विना सहकार नही उध्दार

# महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्या., चांदवड

## संचालक मंडळ

| नाव | पद |
|---|---|
| श्री. डॉ. अरूण पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| सौ. रेखा विलासराव महाजन | व्हा. चेअरमन |
| श्री. तुकाराम पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री. देविदास त्रंबक शेलार | संचालक |
| श्री. निवृत्ती दामोदर निकम | संचालक |
| श्री. अरूण शंकरराव सोनवणे | संचालक |
| श्री. नंदकुमार पुंडलिकराव शेलार | संचालक |
| श्री. दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | संचालक |
| श्री. अशोक शामराव माळी | संचालक |
| श्री. दगाजी रामचंद्र बच्छाव | संचालक |
| श्री. रामदास सदाशिव साळवे | संचालक |
| श्री. किशोर दशरथ शेलार | स्वीकृत संचालक |
| सौ. कल्पना संजय गांगुर्डे | स्वीकृत संचालिका |

### कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| श्री. विलास पंडीतराव आहेर | मॅनेजर |
| श्री. गजेंद्र बाळु शेलार | लिपीक |
| श्री. सतीश मुरलीधर आहेर | लिपीक |
| श्री. राजेश सुभाष व्यवहारे | लिपीक |
| श्री. सुशिल दिगबंर पंडित | शिपाई |

ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

## ९ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

फक्त सभासदांसाठीच

जा.क.पा.स.सन.२०१० दि.२४/०७/२०१०

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची "वार्षिक सर्वसाधारण सभा" रविवार दि.०८/०८/२०१० रोजी सकाळी १०.३० वा. श्री.सुभाषभाऊ कोतवाल यांचे हॉटेल अश्विनी.रेणुका कॉम्प्लेक्स ,महात्मा फुले नागरी सह.पतसंस्थेच्या पाठीमागे चांदवड.येथे आपल्या संस्थेचे चेअरमन मा. श्री.डॉ.अरूण पुंडलिकराव निकम यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती!

### सभेपुढील विषय

१) मा.नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील वार्षिक साधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे
३) सन २००९-२०१० सालाचे नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.
४) सन २००९-२०१० च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०१०-२०११ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
६) सन २००९-२०१० च्या वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.
७) सन २००९-२०१० वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून दोष दुरूस्तीस मंजुरी देणे. (उपलब्ध झाल्यास)
८) मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

आपले नम्र

| श्री.विलास आहेर | सौ.रेखा महाजन | श्री.डॉ.अरूण निकम |
|---|---|---|
| मॅनेजर | व्हा.चेअरमन | चेअरमन |

मा.संचालक मंडळ

### सुचना

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.३१/०७/२०१० पर्यंत लेखी कळवावे.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.

चांदवड जि.नाशिक

## सन २००९ - २०१० चा वार्षिक अहवाल

सस्नेह नमस्कार ......

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

आज ९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो.दि.३१/०३/२०१० अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे.नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून जे मोलाचेसहकार्य केले.ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेवुन संस्थने कठीण निकष लावुन कर्जवाटप, कर्जवसुली व दैनंदिन काम केले आहे. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणुन संस्थेला सलग ५ वर्षे "अ तारांकीत" ऑडीट वर्ग मिळालेला आहे.तर ९वर्षाच्या अल्पकालावधीत संस्था स्वतःच्या मालकीच्या अद्ययावत भव्य नुतन वातानुकूलीत वास्तुत संगणकी--करणासह सुसज्ज अवस्थेत आज आपण पाहात आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे इवलेसे रोपटे अवघ्या ९ वर्षा त्याचे वटवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पहात आहोत.म्हणून चांदवड तालुक्यातील एक अग्रगण्य संस्था म्हणून महात्मा फुले नागरी सह.पतसंस्थेला ओळखले जाते. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्हता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे.म्हणून संस्थेच्या नेत्रदिपक प्रगतीत व नाव लौकीकात आपला मोलाचा वाटा आहे.चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था व बँका आहे.त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी व महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, व्यावसायिकांना कर्जवाटप केले आहे.सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ९६% कर्ज वसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

दरवर्षी वाढता नफा,वाढते कर्ज वाटप , लवाद दाखल न करता होणारी कर्ज वसूली, वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे.मला सांगण्यास अत्यंत आनंद होत आहे की, संस्थेने दि.३१/०३/२००६ रोजी ८,५८,३७५=00 रूपयाची वास्तु खरेदी केली होती, आणि गेल्या वर्षी संस्थेने इंटिरियर डिझाईन साठी ४,६९,१२५=00 रूपये खर्च केले तर सुकॅम कंपनीचे इनव्हर्टर साठी ६५,९००=00 रूपये खर्च केला होता.स्पर्धेच्या युगात व आवश्यकतेची निकड लक्षात घेवून संस्थेने संपूर्ण कार्यालयीन कामकाजासाठी संगणककरण प्रणाली सुरू केलेली आहे.संस्था वातानुकूलीत करण्यासाठी तीन ए.सी. बसविण्यात आले आहे.आज "महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था" ही अंतर - बाहय सुंदर व सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे.या

पेयाचे मानकरी संचालक मंडळ असले तरी खरे पेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा. निकम टी. पी. यांच्या स्वप्नांना मुर्त रूप आले आहे. संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी. पी. हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे आणखी एक पाऊल पुढे पडावे यासाठी मी आपणासमोर संस्थेच्या हिताची भावी योजना मांडणे पसंद करेल. संस्थेला एका सभागृहाची नितांत गरज आहे. आपण सर्वांनी ठरवले तर काम कठीण असले तरी अशक्य नाही असे मला वाटते. दोन वर्षांपासून टॅक्स ऑडीटच्या कठीण परीक्षेतून जावून देखील आपल्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. संस्थेने उपविधित दुरूस्ती करून कार्यक्षेत्रात वाढ करून चांदवड कार्य-क्षेत्र केले आहे. तसेच कर्जवाटपाची मर्यादा आता १0,00,000=00रूपयांपर्यंत केली आहे. अजूनही बरेच काही करावयाचे आहे. विविध योजना आहे. त्यासाठी आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा हृदयाशी बाळगून ९ वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

## भागभांडवल :-

संस्थेचे अधिकृत भागभांडवल २५,00,000=00रूपये असून दि. ३१/0३/२0१0 अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या २७0 असून वसूल भागभांडवल ११८८६00=00 रूपये आहे .अहवाल सालात भाग भांडवल रूपये १८६३00=00 ने वाढ झालेली आहे.

## राखीव व इतर निधी :-

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण स्वनिधी वरून लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि. ३१/0३/२0१0 अखेर संस्थेचा निधी रूपये ३९९३७९२=१0 असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये ६,१४,0६१=00 ने वाढ झालेली आहे.

## ठेवी :-

संस्थेचे उत्कृष्ट कामकाज व संस्थेवर दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. अहवाल वर्षात ठेवीमध्ये रूपये ९८५९५८=00 वाढ झालेली असून या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये ३२५७00३७=00 इतक्या आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छितो.

## कर्ज वाटप :-

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, कामगार मजूर इत्यादी सर्व गरजू व्होतकरू लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातून कर्ज वाटप केलेले आहे. कर्ज वाटप करतांना कर्जदारावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, परत फेडीची क्षमता, त्याची विश्वासार्हता व गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये १६३६२७७१=00 इतके कर्ज वाटप केलेल आहे. गतवर्षाच्या तुलनेत कर्ज वाटपात रूपये ३३८६७६८=00 ने वाढ झालेली आहे.

## थकबाकी :-

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थांच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसुली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. परंतु कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दि. ३१/0३/२0१0 अखेर संस्थेने ९६% इतकी कौतुकास्पद कर्जवसुली केली आहे. कोणत्याही सभासदावर आपण कठोर कारवायी केलेली नाही. यावर्षी १00%कर्जवसूली करून निरंक थकबाकी करण्याचा मानस आमचा आहे. त्यासाठी सर्व सभासदांनी सहकार्य करावे अशी मी विनंती करतो. मागील दोन वर्षापासून एन. पी. ए. लागू झालेला नाही. एन. पी. ए. ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन. पी. ए. चे प्रमाण १.0४% इतके आहे.

## गुंतवणूक :-

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी. डी. रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे पालन केलेले आहे. संस्थेने नियोजनपूर्वक पध्दतीने रूपये१७६८६२६८=00 रूपयांची गुंतवणूक केलेली आहे.

## संचालक मंडळ सभा :-

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १0 सभा झालेल्या असुन संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी आपेक्षा बाळगतो .

## नफा:-

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुल, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकजित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला ३,३२,९५९=00 रूपयांचा निव्वळ नफा झालेला आहे .सदरच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहे प्रतिवर्षीवाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .

## कर्मचारी परिवार :-

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम ,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे .संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा

आहे. संस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

**लेखा परिक्षण :-**

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चित्र समजते संस्थेला गेली ५वर्षापासुन सतत "अ स्टार" ऑडीट वर्ग मिळत होता परंतु मागील वर्षात कामकाजातील किरकोळ त्रुटींमुळे ४८ गुण कमी मिळाले त्यामुळे संस्थेला दुस-यांदा 'अ' ऑडीट वर्गावर समाधान मानावे लागले. संस्थेने पुन्हा एकदा उत्कृष्ट कामकाज करून 'अ तारांकित' वर्ग मिळविण्यासाठी कंबर कसली आहे.

**आभार :-**

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निंबधक श्री. महेश भडांगे साहेब,सहकार व बँकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी,श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), श्री. ठाकरे एस डी (सी. ए.), संस्थेचे वाहन फ्लॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार , राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन केले,भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

॥ जय हिंद...! ॥

आपला स्नेहांकित,

(श्री. डॉ. अरूण निकम)
चेअरमन

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

## नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०१० अखेर

| खर्च | | | उत्पन्न | | |
|---|---|---|---|---|---|
| **इतर खर्च** | | | **इतर उत्पन्न** | | |
| ग्रामपंचायत कर | १३६२.०० | | नोटीस खर्च जमा | ७५००.०० | |
| अल्पबचत कमिशन खाते (खर्च) | २९८३८.०० | | अल्पबचत कमिशन खाते (उत्पन्न) | २३९.०० | ७७३९.०० |
| शिक्षण निधी खर्च | ५०००.०० | | **व्याज उत्पन्न खाते** | | |
| ऑडिट फि खर्च | ३०४४८.०० | | अल्पबचत ॲडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न) | ३३५७.०० | |
| पोस्टेज व टेलिफोन खर्च | ९३३१.०० | | गृहतारण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | २०३३७२.०० | |
| प्रिंटिंग व स्टेशनरी | ५६२५०.०० | | वैयक्तीक कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | ३८५७४४.०० | |
| किरकोळ खर्च | ५७०१७.०० | | हायरपर्चेस कर्जावरील व्याज जमा (उत | ७०७०२३.०० | |
| लाईट बिल खर्च | १४९०७.०० | | मॉरगेज कर्जावरील व्याज जमा (उत्पन | ७६२४०१.०० | |
| लॉकर भाडे | ३०००.०० | | नजरगहाण कर्जावरील व्याज जमा (उत्प | १२३०३०.०० | |
| जाहिरात खर्च खाते | ३५३००.०० | | सोनेचांदी कर्जावरील व्याज जमा (उ | २६६५५३.०० | |
| प्रवास खर्च | ११००.०० | | मुदत ठेव अडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न) | ७१४५६.०० | २५२२९३६.०० |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ५३५२८.०० | | **गुंतवणुकिवरील व्याज** | | |
| वकिल फी खर्च खाते | ५४५०.०० | | गुंतवणुकिवरील व्याज खाते | ७६८२०९.०० | ७६८२०९.०० |
| भविष्य निर्वाह निधी | १९७००.०० | | **अल्पबचत स्टेशनरी** | | |
| दुरूस्ती व देखभाल खर्च खाते | ३०२३०.०० | | अल्पबचत स्टेशनरी जमा | १०.०० | १०.०० |
| व्यवसाय कर खर्च | ५००.०० | | **डि.डि.कमिशन** | | |
| मानधन खाते | १७४०७.०० | ३७०३६८.०० | डि.डि.कमिशन | ७२२२.०० | ७२२२.०० |
| **व्याज खर्च खाते** | | | **प्रवेश फि** | | |
| अल्पबचत ठेवीवरील व्याज खर्च | १६११६.०० | | प्रवेश फी | ११०.०० | ११०.०० |
| मुदत ठेवीवरील व्याज खर्च | २२६०९६९.०० | | **बँक चार्जेस** | | |
| जेष्ठ नागरिक ठेवीवरित व्याज | ३३८६४.०० | | बँक चार्जेस | ११.०० | ११.०० |
| बचत ठेवीवरील व्याज खर्च | १४६४५३.०० | २४५७४०२.०० | **इतर खर्च** | | |
| **पगार खाते** | | | विमा खर्च | ६५१९२.०० | ६५१९२.०० |
| पगार खाते | २१०८००.०० | २१०८००.०० | **सशस्त्र सेना ध्वजदिन २००७ निधी** | | |
| | | | सशस्त्र सेना ध्वजनिधी २००७ निधी | १००.०० | १००.०० |

महात्मा फुले नागरी सह . पतसंस्था मर्या . चांदवड

नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०१० अखेर

| खर्च | | | उत्पन्न | | |
|---|---|---|---|---|---|
| ताळेबंद कडे एकुण नफा | | ३३[illegible]२९५९ . 00 | | | |
| | | ३३७१५२९ . 00 | | | ३३७१५२९ . 00 |

महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.
रजि.नं. एनएसके/सीएचडी/आरएसआर/सीआर/८४०/ दि.२९-५-२००१ चांदवड
★ ता.चांदवड, जि.नाशिक ★

चेअरमन संचालक मॅनेजर
महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.
चांदवड, ता.चांदवड, जि.नाशिक.

# महात्मा फुले नागरी सह . पतसंस्था मर्या . चांदवड
## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१० अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| भागभांडवल | ११८८६००.०० | रोख शिल्लक | ११६००५.१० |
| सभासद भागभांडवल | ११८८६००.०० | बॅंक | २२९६८४८.०० |
| ठेवी | ३२५७००३७.०० | एन डी सी सी बॅंक चालु (करंट) | ६४६५८५.०० |
| मुदत ठेव खाते | २४४३६१४०.०० | एन डी सी सी बॅंक सेव्हींग खाते | २१६१८९.०० |
| अल्पबचत ठेव खाते | १०२२१०.०० | नामको बॅंक चालु खाते (शाखा चांदवड | २२७९४.०० |
| बचत ठेव खाते | ४०१७६३१.०० | बॅंक चालु खाते (स्टेट बॅंक) | १३६००७.०० |
| दामदुप्पट ठेव | ३२८६८९.०० | दि चांदवड मर्चन्टन्स बॅंक चालु खाते | ९८४५९१.०० |
| सुरक्षा ठेव खाते | ३०६७७.०० | ॲक्सिस बॅंक शाखा लासलगांव | २९०६८२.०० |
| ज्येष्ठ नागरिक सुविधा | २९९२४४०.०० | गुंतवणुक | १७६८६२६८.०० |
| जेष्ठ नागरिक सुविधा | ६६२२५०.०० | एन डी सी सी बॅंक मुदत ठेव खाते | १०३३१०००.०० |
| निधी | ३९९२७९२.१० | नामको बॅंक मुदत ठेव (चांदवडशाखा) | १५०१०००.०० |
| राखीव निधी | ६३७६७१.०० | स्टेट बॅंक (शाखा चांदवड) मुदत ठेव | ३६९१९९४.०० |
| इमारत निधी | १८१६८७५.५० | लॉकर डिपॉझिट | २०३५०.०० |
| सभासद लाभांश समिकरन | २७३०५.०० | रिझर्व्ह फंड एन डी सी सी बॅंक | ६३३४९१.०० |
| सभासद कल्याण निधी | १२९५३६.०० | बॅंक इमारत फंड | ५८८३.०० |
| विमा निधी | १००८९६.५० | नाशिक जि पत फेडरेशन शेअर्स | ५००.०० |
| झिज फंड | ३५०१६६.०० | महा . राज्य पतसंस्था फेडरेशन शेअर्स | १०००.०० |
| संशयीत व बुडित कर्ज निधी | १०४९९७.१० | नाशिक जि मध्य . सह बॅंक लि नाशिक ३ | १०५०.०० |
| बोर्ड व स्टाप ट्रेनिंग फंड | ३७५४०.०० | स्टेट बॅंक मुदत ठेव शाखा वडाळीभोई | १५०००००.०० |
| फर्निचर निधी | ४६९१२५.०० | कर्ज | १६३६२७७१.०० |
| कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | ३९४००.०० | वैयक्तीक कर्ज | २१०६८०२.०० |
| कॉम्पुटर निधी | १५१३००.०० | हायरपर्चेस कर्ज | ३६०९८३४.०० |
| इनव्हर्टर निधी | ६५९००.०० | मॉरगेज कर्ज | ६२२६१२०.०० |
| ए . सी . निधी | ६२०८०.०० | नजरगहाण कर्ज | ५२५४६९.०० |
| देणी व तरतुद | ९१३८५.०० | सोने चांदी तारण कर्ज | २२५८४१६.०० |
| ऑडिट फी देणे | ३००००.०० | मुदत ठेव ॲडव्हान्स | ६५१०००.०० |
| शिक्षण निधी देणे | ५०००.०० | गृहतारण कर्ज | ९८५१३०.०० |
| आयकर तरतुद | ५०००.०० | इतर येणे | ४४३९७.०० |
| एन पी ए तरतुद | ३००००.०० | टेलिफोन अनामत खाते | २०००.०० |
| सेवक सानुग्रह अनुदान | २००००.०० | डि टी पी एल सेवा केंद्र डिपॉ | ८०००.०० |
| अनामत खाते | १३८५.०० | डिगीटच टेलिमॅक्स प्रा . लि . पुणे | ३४३९७.०० |
| | | कायम मालमत्ता | ८५८३७५.०० |
| | | कायम मालमत्ता खाते | ८५८३७५.०० |
| | | डेडस्टॉक | ८०९५१६.०० |

महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१० अखेर

| भांडवल व देणी | | मालमत्ता व येणी | |
|---|---|---|---|
| | | डेडस्टॉक खाते | ८०९५१६.०० |
| | | लायब्ररी | १५९३.०० |
| | | लायब्ररी खाते | १५९३.०० |
| एकुण नफा | ३३२९५९.०० | | |
| | ३८१७५७७३.१ | | ३८१७५७७३.१ |

महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. रजि.नं. एनएसके/सीएबडी/आरएसआर/सीआर/८४०/ दि.२९-५-२००१ चांदवड ता.चांदवड, जि.नाशिक

चेअरमन संचालक मॅनेजर
महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.
चांदवड, ता.चांदवड, जि.नाशिक.